(33)

(15)

# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर यांचे कार्यालय

विषय :– नागपूर विनिअर्स प्रायव्हेट लिमिटेड यांचा उप मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांना पाठविलेला दिनांक 4 एप्रिल 2005 चा अर्ज.

क्र.कक्ष–5/दक्षता/प्र.क्र.183/2004–05/05–06/ 9326

नागपूर, दिनांक 26/9/2005

Email:- cfnct_ngp@sancharnet.in

प्रति,

मुख्य वनसंरक्षक (संरक्षण)

महाराष्ट्र राज्य,

नागपूर

संदर्भ :– आपले कक्षिल पत्र क्रमांक कक्ष–16/आगि/प्र.क्र.4/120/2005–06 दिनांक 21.5.2005

............

उपरोक्त संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यांत येते की, आगिरणी परवाना क्रमांक 373/77 एक उभा 42" आरायंत्राकरिता जिल्हा परिषद, नागपूर अंतर्गत जिल्हा परिषद सुतार प्रशिक्षण केंद्र, बोथिया पालोरा, ता. रामटेक, जिल्हा नागपूर करिता प्राप्त होता. सदर परवान्याचे सन 1978 पासून नुतणीकरण करण्यांत आलेले नव्हते.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, नागपूर अंतर्गत बोथिया पालोरा, ता. रामटेक येथिल सुतार प्रशिक्षण केंद्रातील खालील यंत्र सामुग्री (जे आहे तसे आहे) या तत्वावर जाहीर लिलाव दिनांक 26 जून,1996 रोजी 12.00 वाजता बोथिया पालोरा येथिल प्रशिक्षण केंद्रासमोर करण्याबाबत जाहीरात वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यांत आली होती. सदर जाहीरातीमध्ये खालील सामुग्रीचा तपशिल देण्यांत आला होता. (जोडपत्र एक)

| अ.क्र | सामुग्रीचे विवरण | घसारा वर्ष |
|---|---|---|
| 1. | आरामशिन पूर्ण यंत्रणा मॉडेल 77–78 | 1977–78 |
| 2. | इतर सुटे भाग | 1977–78 |
| 3. | प्रशिक्षण केंद्राच्या शेडचे सुटे भाग | 1977–78 |

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी त्यांचे कक्षिल पत्र क्रमांक जिपना/समकवि/लिलाव/2956/96 दिनांक 10.9.96 अन्वये मे. नागपूर विनिअर्स प्रायव्हेट लिमीटेड, नागपूर यांना त्यांची दिनांक 26.6.1996च्या लिलावातील बोली रु. 85000/– मंजूर करण्यांत आली असून उर्वरित 75 टक्के रक्कम आठ दिवसांत भरण्याचे आदेश दिलेत. तसेच त्यांचेकक्षिल पत्र क्रमांक 3012/96 दिनांक 23.9.96 अन्वये रकमेचा भरणा केल्याने सदर आदेश प्राप्त झाल्याचे दिनांकापासून 15 दिवसाचे

तसेच सदर पत्रात खालील बाब
आंत लिलावाचे साहित्य आहे त्या स्थितीत घेवून जाण्याचे आदेश दिले. नुतणीकरणास हे
प्रामुख्याने नमुद करण्यांत आलेली आहे."आरामशिन लायसन्स कमांक 273/1977 कोणताही
कार्यालय जबाबदार राहणार नाही. नुतणीकरणाची कोणतीही हमी घेणार नाही व त्या करिता त्या
खर्च देण्यांत येणार नाही. लायसन्स नुतणीकरणासाठी वरिल प्रमाणे वनविभागाशी संपर्क करावा व
करिता आवश्यक शुल्काचा भरणा वन विभागाचे शिफारसीनुसार करावा" (जोडपत्र दोन व तीन)

तसेच उपवनसंरक्षक, नागपूर यांना समाज कल्याण अधिकारी,जिल्हा परिषद
नागपूर यांचे कडिल पत्र कमांक 3464/96 दिनांक 7.11 96 अन्वये कळविण्यांत आले की, सुतार प्रशिक्षण
केंद्र बोथिया पालोरा येथे आरागिरणी लायसन्स क.373/77 ही मशिन बोथिया पालोरा येथे कार्यरत होती.
सदर आरागिरणीचे नुतणीकरणा करिता पत्र कमांक 1400 दिनांक 22.4.83 नुसार अर्ज सादर केला होता.
सन 1989 पासून प्रशिक्षण बंद झाल्याने सदर आरागिरणी बंद आहे. तसेच सदर आरागिरणी मे. नागपूर
विनिअर प्रायव्हेट लिमिटेड,नागपूर यांना विकल्याने त्यांचे नांवे करुन देण्यांस विनंती करुन पूर्ण अधिकार
देण्यात येत असल्याचे नमुद केले आहे. (जोडपत्र चार)

समाज कल्याण अधिकारी,जिल्हा परिषद नागपूर यांनी रु. 50/– चे स्टॅम्प पेपरवर
दिनाक 15.3.97 ला हमीपत्र लिहून दिले असून सदर हमीपत्रात बोथिया पालोरा येथिल आरागिरणी
लायसन्स 373/77 इतर सामानासह लिलावाद्वारे मे. नागपूर विनर्स प्रायव्हेट लिमिटेड,महालगांव त.
कामठी, जि.नागपूर यांना विकण्यांत आली आहे. त्यांनी संपूर्ण रक्कम ह्या कर्यालयात जमा केली आहे.
करिता आरागिरणी ला. क.373/77 व आरागिरणी हस्तांतरण व स्थानांतरण करण्यास काहीच हरकत
नाही. व आरागिरणी ला. क.373/77 मे. नागपूर विनर्स प्रायव्हेट लिमिटेड,महालगांव त.कामठी, जि.नागपूर
यांच्या नावाने करुन देण्यांत यावे व या बाबतचे सर्व अधिकार मे. नागपूर विनिअर्स प्रा. लि.,महालगांव तह.
कामठी जि.नागपूर यांना देण्यांत येत आहे.(जोडपत्र पाच)

उपवनसंरक्षक,नागपूर वनविभाग, नागपूर यांनी त्यांचे पत्र कमांक कक्ष–6/
राजस्व–1/ 9026 दिनांक 7.2.97 अन्वये आरागिरणी परवाना कमांक 373/77 चे 1997 पर्यन्तचे
नुतणीकरणा करिता व डुप्लिकेट परवान्या करिता नुकसान भरपाईसह रु. 13025/– म मे. नागपूर विनर्स
प्रायव्हेट लिमिटेड,महालगांव त.कामठी, जि.नागपूर यांना 3 दिवसाच्या आत रक्कम बँक ड्रॉफद्द्वारे भरणा
करण्यासंबधी नोटिस जारी केली होती. तसेच त्यांचे पत्र कमांक 5074 दिनांक 13.3.97 अन्वये सदर
परवान्याचे सन 1997 पर्यन्त जिल्हा परिषद सुतार प्रशिक्षण आणि उत्पादक संस्था, बोथिया पालोरा यांचे
नावे नुतणीकरण करुन परवाना त्यांना हस्तांतरीत करण्याबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी, देवलापार यांना
सूचना देण्यांत आल्या होत्या. (जोडपत्र सहा व सात)

आरागिरणी परवाना कमांक 373/77 मधील 42" उभे एक आरायंत्र दिनांक 26.6.
96 च्या लिलावात मे. नागपूर विनिअर्स प्रायव्हेट लिमिटेड,महालगांव कापसी, नागपूर चे भागीदार श्री.
अविनाश वसंत महाजन यांनी खरेदी केल्याने परवान्याचे सन 1977 ते 1997 पर्यन्त तत्कालीन

उपवनसंरक्षक, नागपूर यांनी दंड आकारुन नुतणीकरण करुन दिलेला आहे. मुख्य वनसंरक्षक (उत्पादन) म.रा. नागपूर यांचे परिपत्रक क्रमांक कक्ष–16/आगी/प.र.नुतणी/2218/97–98 दिनांक 29.1.1998 अन्वये मुंबई वन नियम 1942 मधिल नियम 88 (4), 88 (5), व 88(6) चे तरतूदी प्रमाणे स्पष्ट होते की, एखाद्यावर्षी परवान्याचे नुतणीकरण न झाल्यास तो परवाना आपसूकच व्यपगत ठरतो. असा व्यपगत झालेला परवाना पुनः स्थापन करण्याची तरतूद नियमामध्ये नाही. परवान्याचे नुतणीकरण न झाल्याने आरागिरणी बिनापरवाना ठरत असल्याने अशा बिना परवाना आरागिरणीसाठी नुतणीकरणाद्वारे परवाना देण्याचे अधिकार अनुज्ञप्ती अधिका–यास नाहीत. व अशा प्रकारची परवाना नुतणीकरणासाठी मंजूरी देण्याची कार्यवाही करणे म्हणजे नविन परवाना देण्याचा प्रकार ठरतो. (जोडपत्र आठ)

तसेच उपवनसंरक्षक, नागपूर यांचे कडिल पत्र क्रमांक कक्ष–6/सॉमील/जी/1214 दिनांक 2.6.2000 अन्वये आरागिरणी परवाना क्रमांक 373/77 श्री. अविनाश वसंत महाजन, संचालक मे. नागपूर विनिअर्स प्रायव्हेट लिमिटेड, महालगांव कापसी त.कामठी जि. नागपूर यांचे नांवे नामांतरण करण्यांत आला आहे. (जोडपत्र नउ)

तसेच मुख्य वनसंरक्षक (संरक्षण) म.रा.नागपूर यांनी अतिरिक्त 42" आडवा 1 आरायंत्रास परवानगी दिली असून सदर परवान्याचे सन 2001 पर्यन्त नुतणीकरण करण्यांत आलेले आहे.

श्री. अविनाश वसंत महाजन, संचालक मे. नागपूर विनिअर्स प्रायव्हेट लिमिटेड, महालगांव कापसी त.कामठी जि. नागपूर यांनी बोथिया पालोरा येथिल आरायंत्र बिनापरवानगीने प्लॉट क्रमांक 138 अ मौजा महालगांव त.कामठी जिल्हा–नागपूर येथे स्थानांतरीत केले आहे.

प्रस्तुत प्रकरणातील दस्ताएवजाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, आरागिरणी परवाना क्रमांक 373/77 हा जिल्हा परिषद,नागपूर अंतर्गत समाज कल्याण विभागाद्वारे चालविण्यांत येणा–या सुतार प्रशिक्षण केंद्र बोथिया पालोरा करिता परवाना देण्यांत आला असून आदिवासी लोकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याकरीता सुतार प्रशिक्षण केंद्र चालविण्यांत येत होते. सदर सुतार प्रशिक्षण केंद्र सन 1989 पासून बंद झाल्याने सदर प्रशिक्षण केंद्रातील पडित आरायंत्र, यंत्रे व शेड जाहीर लिलावाद्वारे दिनांक 26.6.1996 ला विकी करण्यांत आले होते. तसेच सुतार प्रशिक्षण केंद्र सन 1888–89 पासून बंद असल्याने तसेच सदर आरागिरणीतील यंत्र दिनांक 26.6.1996 ला जे आहे तसे आहे या तत्वावर लिलावाद्वारे विकी करण्यांत आली असतांनाही सदर परवान्याचे सन 1997 पर्यन्त जिल्हा परिषद सुतार प्रशिक्षण आणि उत्पादक संस्था, बोथिया पालोरा यांचे नावे नुतणीकरण करण्याची उपवनसंरक्षक, नागपूर यांची कार्यवाही चुकीची ठरते. तसेच श्री. अविनाश वसंत महाजन, संचालक मे. नागपूर विनिअर्स प्रायव्हेट लिमिटेड, महालगांव कापसी त.कामठी जि. नागपूर यांनी सदर पडित आरायंत्र,यंत्रे व शेड लिलावाद्वारे खरेदी केल्याने उपवनसंरक्षक,नागपूर यांची त्यांचे कडिल पत्र क्रमांक कक्ष– 6/सॉमील/जी/1214 दिनांक 2.6.2000 अन्वये आरागिरणी परवाना क्रमांक 373/77 श्री. अविनाश वसंत महाजन, संचालक मे. नागपूर विनिअर्स प्रायव्हेट लिमिटेड, महालगांव कापसी त.कामठी जि.

नागपूर यांचे नांवे नामांतरण करण्याची कार्यवाही सर्वोच्च न्यायालयाचे दिनांक 4.3.1997 च्या आदेशाचे उल्लंघन ठरते.

तत्कालीन उपवनसंरक्षक, नागपूर यांनी आरागिरणी परवाना कमांक 373/77 पुर्नजिवीत करुन परवान्याचे सन 1977 ते 1997 व 1997 ते 2001 पर्यन्त केलेल्या नुतणीकरणाच्या व आरागिरणी परवान्याचे नामांतरणाच्या कार्यवाही बाबत तत्कालीन उपवनसंरक्षक, नागपूर यांचेवर कार्यवाही करण्याबाबतचे प्रस्ताव वेगळयाने सादर करण्यांत येईल.

तसेच अतिरिक्त आडवे 1 आरायंत्रास मुख्य वनसंरक्षक (संरक्षण) म.रा.नागपूर यांनी दिलेली परवानगी ही उच्च न्यायालयीन आदेशाचे उल्लंघन ठरत असून या बाबत वेगळयाने कर्यवाही चालू आहे.

नागपूर विनिअर्स प्रायव्हेट लिमिटेड यांचे दिनांक 4 एप्रिल, 2005 चे अर्जामधील मुद्या कमांक 1 ते 5 मुद्याबाबतचा सविस्तर खुलासा उपवनसंरक्षक, नागपूर यांचेकडून अप्राप्त असून प्राप्त होताच सादर करण्याची तजविज ठेवण्यांत येत आहे.

सहपत्र :–वरिल प्रमाणे

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),
नागपूर.

प्रतिलीपी :– उपवनसंरक्षक, नागपूर वनविभाग, नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता अग्रेषित. कक्ष–6/सॉमील/जी/1214 दिनांक 2.6.2000 अन्वये आरागिरणी परवाना कमांक 373/77 पुर्नजिवीत करुन नुतणीकरणाची व श्री. अविनाश वसंत महाजन, संचालक मे. नागपूर विनिअर्स प्रायव्हेट लिमिटेड, महालगांव कापसी ता.कामठी जि. नागपूर यांचे नांवे नामांतरणाची कार्यवाही चुकिची असून सदर परवाना सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाचे उल्लंघन ठरत असल्याने सदर परवाना नुतणीकरण व नामांतरणाची चुकिची कार्यवाही करणा–या अधिका-यांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याबाबतचे प्रस्ताव सादर करावे.

तसेच आरागिरणी परवाना कमांक 373/77 चे सन 1997 व त्या पुढील कालावधी करिता नुतणीकरण व परवाना नामांतरणाची कार्यवाही करण्यास तसेच स्थानांतरणाचे प्रस्ताव या कर्यालयास पाठविण्यास जबाबदार असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांची नांवे कार्यरत कालावधीसह तात्काळ या कार्यालयास सादर करावी.